
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# VIDYAWARTA®

Peer Reviewed International Referred Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

Revised Edition

Jan. To March 2020
Issue-33, Vol-05

Date of Publication
01 Feb. 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

26) समतोल आहार आणि आरोग्य
डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे, चंद्रपूर ||110

27) नवा श्रावणबाळ : एक शोध
प्रा. डॉ. जयश्री संजय सातोकर, भंडारा ||113

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार
प्रा.डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण, जि. बीड ||116

29) विरामचिन्हांच्या अपुऱ्या ज्ञानामुळे मराठी विषयाच्या लेखन कौशल्यात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास
डॉ. रंजना वि. तिजारे, नागपूर ||118

30) अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजजीवन
प्रा.डॉ.मनमोहन विश्वनाथ राजे, जि. कोल्हापूर ||122

31) भाषा आणि प्रसार माध्यमे
प्रा. रंजना ज्योतीराम महाजन, जि. गोदिंया ||128

32) दामोदर मोरे की हिन्दी कविता में अस्मितामूलक प्रतिरोध
डॉ. बी. एल. आर्य, भीलवाड़ा (राज.) ||132

33) लिङ्ग महापुराण में योग साधना निरूपण
डॉ० चेतना भण्डारी, अल्मोड़ा, उत्तराखण्ड ||135

34) पचपन खंबे लाल दीवारें उपन्यास में सुषमा की बेबसी
डॉ. बळीराम संभाजी भुक्तरे, जि. लातुर, महाराष्ट्र ||138

35) साहित्य और सिनेमा में साम्य—वैषम्य
श्री. महेश बापुराव चव्हाण, जिला सातारा ||143

36) समाज के विकास में अनुसंधान की भूमिका
डॉ. प्रमिला नागवंशी, जिला—महासमुन्द (छ.ग.) ||146

37) पंचायती राज व्यवस्था संघीय व्यवस्था के तृतीय स्तर के रूप में
सुश्री सीमा अग्रवाल, डॉ. आर. के. पुरोहित & डॉ. सुभाष चंद्राकर, रायपुर ||148

38) किन्नर समुदाय का जीवन यथार्थ
डॉ. अनुसुइया अग्रवाल, महासमुन्द (छ.ग.) ||152

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
Jan. To March 2020
Issue-33, Vol-05
0122

30

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजजीवन

प्रा.डॉ.मनमोहन विश्वनाथ राजे,
शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

## १. प्रस्तावना :

१९६० नंतर दलित साहित्यनिर्मिती अतिशय जोमाने सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या र[illegible]जिक कार्याचा आणि त्यांच्या चळवळीची प्रेरणा घेऊन दलित साहित्यिकांनी कथा, कादंबरी, काव्य, आत्मचरित्र अशा व इतर वाङ्मयप्रकारांमध्ये लेखन केले आहे. दलित अस्मिता जागे होण्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतत्त्व हेच कारणीभूत असल्यामुळे लेखन झालेले आहे. प्रबोधन झाल्यामुळे दलित साहित्यामध्ये नायक बोलू लागले. त्यापूर्वी ते मूकनायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केलेली होती. १९५५ पर्यंत अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, परंतु तो दूर होत नाही असे वाटल्यानंतर १९५६ साली त्यांनी समाजाला सोबत घेऊन धर्मपरिवर्तन केले. महाडच्या चवदार तळयाचा १९२७ सालचा सत्याग्रह, १९२९ सालचा पुणे येथील पर्वत मंदिर प्रवेश, १९३६ सालची मुंबई इलाखा महार परिषद यातून आंबेडकरांनी धर्मांतराविषयी तात्विक भूमिका मांडलेली होती. त्यातूनही हि[illegible] समाजाने पुरेसे लक्ष दिले नसल्यामुळे त्यांनी धर्म परिवर्तन केले. त्याचा परिणाम म्हणजे दलितांची अस्मिता जागी झाली. माणुसकीचा तो मुक्तिलढा ठरला आणि पुढे साहित्यातून प्रबोधन होऊ लागले.

## २. अण्णा भाऊ साठे : जडणघडण :

मानवतावादाने प्रेरित होऊन दलित साहित्यामध्ये मोलाचे लेखन केलेले अण्णा भाऊ साठे यांचा जीवनवृत्तांत तितकाच प्रेरणादायी आहे. सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव हयाठिकाणी १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णा भाऊ साठे यांचा तेव्हाच्या अस्पृश्य असलेल्या मांग जातीमध्ये त्यांचा जन्म झाला. तत्कालीन काळामध्ये अस्पृश्य समाजाला जातिभेदाच्या भिंतीमुळे मुख्य प्रवाहापासून दूर रहावे लागले. वर्णव्यवस्था आणि जातीय द्वेशभावनेमुळे त्यांना शिक्षण मिळू शकले नाही. अल्पशिक्षण मिळाले. त्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत त्यांची फक्त दीड दिवसाची शाळा असे म्हटले जाते.

उदरनिर्वाहासाठी वणवण फिरणे आणि काबाडकष्ट करणे यावाचून त्यांच्यासमोर पर्याय नसल्यामुळे अण्णा भाऊ साठे यांनी मुंबई जवळ केली. त्याठिकाणी हमाल, बूट पॉलिश, कुत्री सांभाळणे, मजूरी, पोस्टर चिकटविणे, घरगडी अशी विविध प्रकारची कामे करून उदरनिर्वाह केला. कामगार म्हणून त्यांना अनेक अनुभव येत होते, त्यातूनच ते तावून सुलाखून निघाले, आणि ते लेखनाकडे वळलेले आहेत.

## ३. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य :

अण्णा भाऊ साठे यांचे लेखन वैविध्यपूर्ण आहे. विविध वाङ्यप्रकारातून त्यांनी लेखन केले आहे. कथा, कादंबरी, कविता, पोवाडे, प्रवासवर्णन, लोकनाटय इ. वाङ्मय प्रकारांच्या लेखनातून अण्णा भाऊ साठे वाचकाच्या मनामध्ये विराजमान झालेले आहेत. त्यांच्या एकूण कादंबऱ्यांपैकी सात कादंबऱ्यावर आधारित चित्रपटनिर्मिती झाली आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे कसदार लेखन असल्यामुळे समाजातील सर्वच स्तरावरील वाचकांनी लेखनाचे स्वागत केले आहे. तत्कालिन समीक्षकांनी त्यांच्या लेखनाची नोंद घेतली नाही. याचे कारण अण्णा भाऊ साठे यांची जात कारणीभूत होती. अस्पृश्य जातीत त्यांचा जन्म झाला असल्यामुळे त्यांना उपेक्षित ठेवले, मात्र वाचकांनी त्यांना उपेक्षित ठेवले नाही. अण्णा भाऊ यांनी केलेले लेखन हे आपले आहे, त्यांनी आपले प्रश्न मांडले आहेत, आपल्या जातीची वेदना त्यांनी मांडली, हा आपलेपणा वाचकांना वाटल्यामुळे वाचकांकडून ते उपेक्षित राहिले नाहीत उलट पुढील काळात अण्णा भाऊ साठे यांना आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळाली. रशियन क्रांतीचा इतिहास